दैनिक
महामेट्रो
www.mahametronews.in
वर्ष ४ थे : अंक : १८ पुणे, सोमवार ८ सप्टेंबर २०२५
RNI NO.MAHMAR2022/87390
पाने : ४ किंमत : ३.००
VOL NO.04. ISSUE : 18 Pune, Monday, 8 September 2025
Pages : 4 PRICE : 3.00

चिंचवडमध्ये १७ वर्षीय तरुणाकडून तलवार जप्त

चिंचवड- पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेने चिखलीतील साने चौकातून १७ वर्षीय तरुणाला ताब्यात घेऊन त्याच्याकडून तलवार जप्त केली. गुप्त माहितीच्या आधारे सोमवारी ही कारवाई करण्यात आली.

महत्वाचे...

तरुणाला मारहाण; गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

मोरवाडीतील लाल टोपीनगर परिसरात जुन्या भांडणाच्या कारणावरून एका ३५ वर्षीय तरुणाला मारहाण करण्यात आली. या प्रकरणी चार जणांविरोधात संत तुकाराम नगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी विजय बन्सीलाल कुर्मी (वय ३५, रा. लालटोपीनगर, मोरवाडी, पिंपरी) यांच्यावर आरोपी साहिल उर्फ बजरंग संदिप जानराव (वय २०), सार्थक शंकर कागदे (वय १९), जावेद सलीम शेख (वय १७) आणि आसिफ उर्फ सिराजुदिन आल्लवद्दीन खान (वय २०) यांनी हल्ला केला. आरोपींनी फिर्यादींना आई-बहीणीवरून शिवीगाळ केली. त्यानंतर सिमेंट गट्ठा, काठी तसेच लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले. या घटनेनंतर पोलिसांनी गुन्हा नोंदवला असून आरोपींपैकी एकाला अटक करण्यात आली आहे.

लोखंडी तलवारीसह युवक अटक

पुणे । प्रतिनिधी

पोलिसांच्या मनाई आदेशाचा भंग करून लोखंडी तलवार बाळगणाऱ्या युवकाला निगडी पोलिसांनी शनिवारी मध्यरात्रीच्या सुमारास पकडले. प्रकाश उर्फ पक्या तुकाराम शिंगे (वय ३५, रा. ओटास्क्रिम, निगडी) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव असून, त्याच्याकडून ५०० रुपयांची लोखंडी तलवार जप्त करण्यात आली. ही कारवाई संजय हॉटेलच्या पाठीमागील बोळात करण्यात आली. मनाई आदेशाच्या काळात शस्त्र बाळगल्याबद्दल आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा व महाराष्ट्र पोलीस कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

तरुणावर लाकडी फळीने हल्ला; गंभीर जखमी

पुणे । प्रतिनिधी

शिवशक्ती कॉलनी परिसरात किरकोळ वादातून तरुणावर लाकडी फळीने हल्ला करून त्याला गंभीर जखमी करण्यात आले. शुभम आदिवारेकर (वय २८, रा. काळेवाडी) असे आरोपीचे नाव असून त्याचे काही साथीदार अद्याप फरार आहेत. फिर्यादी अनिल काटे यांच्या भावाला मारहाण झाल्याने त्यांनी आरोपीला जाब विचारला असता वाद वाढला. त्यावेळी आरोपी व त्याच्या साथीदारांनी अनिल काटे यांना पकडून डोक्यात लाकडी फळीने प्रहार केला. या प्रकरणी काळेवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

पिंपरीत ३० लाखांची फसवणूक

पुणे । प्रतिनिधी

पिंपरी व रहाटणी परिसरात जमीन व्यवहाराच्या नावाखाली एका व्यक्तीची तब्बल ३० लाख रुपयांची फसवणूक करण्यात आली आहे. या प्रकरणी रोहन साळुंके, गणेश उर्फ बाळासाहेब शिंदे व तीन महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपी अद्याप फरार आहेत. फिर्यादी नितीन वाघमारे यांनी आपल्या पार्टनरसह जागा खरेदीसाठी व्यवहार केला होता. मात्र, आरोपींनी रक्कम घेतल्यानंतर फिर्यादी दलित समाजातील असल्याचे सांगून त्यांच्याशी व्यवहार नाकारला व दुसऱ्याशी जमीन व्यवहार करून फसवणूक केली.

गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक

१) अलका चौक : रंगावली संस्थेतर्फे गणेश विसर्जनासाठी आलेल्या गणरायासाठी अलका चौकात भव्य अशी रांगोळी काढण्यात आली होती. ही रांगोळी सर्वांचे लक्ष वेधत होते. २) **लक्ष्मीरस्ता:** श्री कसबा गणपती मंडळ विसर्जन मिरवणुकीत पारंपारिक वाद्य वाजवित शिस्तबद्ध मिरवणूक काढण्यात आली होती. ध्वज संचलन सर्वांचे आकर्षण ठरले होते. ३) **येरवडा :** शहराच्या उपनगरात विसर्जन घाटावर आलोट गर्दी झाली होती.याठिकाणी गणेश विसर्जनासाठी बांधण्यात आलेले हौद कमी पडत होते. त्यामुळे आलेल्या भाविकांनी नाराजी व्यक्त केली. ४) **चित्रा चौक :** येरवड्यातील चित्रा चौकात अनेक गणेशोत्सव मंडळांनी विसर्जन मिरवणुकीत बीम लाईटचा प्रतिबंध असताना वापर करण्यात आला होता.

पुण्यात घर बांधायचे आहे; घराला विमान धडकणार नाही याचा परवाना घ्या

पुणे शहर, पिंपरी चिंचवड आणि पीएमआरडी हद्दीत घर बांधण्यासाठी 'मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स'ची परवानगी

पुणे । प्रतिनिधी

स्वतःचे घर असावे असे प्रत्येकाचे स्वप्न असते. ते घर स्वतःच्या जागेत बांधायचे म्हटले कि वेगळाच आनंद असतो. स्वतःच्या जागेत घर बांधायचे म्हटले की महापालिका बांधकाम विभागाची परवानगी आली. मात्र महापालिका घराला विमान धडकणार नाही ना? याची संरक्षण मंत्रालयाची परवानगी मागते. त्यासाठी प्रथम पुणे शहर किंवा जिल्ह्याचा नकाशा घेणे, तो नकाशा मोनार्क या संस्थेला देऊन त्यांच्याकडून घराचे चारही टोकांचे अक्षांश व रेखांश घेऊन नकाशा तयार करणे त्यासाठी मोनार्कला वीस हजार रूपये शुल्क द्यावे लागतात.

घराची उंची नव्वद मीटरपेक्षा अधिक असेल तर गुजरात, गांधीनगर येथील संरक्षण मंत्रालयाच्या कार्यालयातून परवानगी घेणे, येथे मध्यस्थ किंवा दलालांना एक ते दीड लाख रूपये देऊन परवाना घेणे आवश्यक असते. त्यानंतर घर बांधण्याची परवानगी मिळते. संपूर्ण भारत देशात हा नियम फक्त पुणे शहराला लागू आहे. त्यामुळे पुणेकरांचा अंत किती पाहणार असा प्रश्न सामान्य नागरिकाला पडल्याशिवाय राहत नाही. पुणे शहर, पिंपरी चिंचवड व जिल्हा नकाशांची विक्री बंद झाली आहे. पुणे वगळता राज्यातील कोणत्याच शहरातील नकाशांची विक्री बांधकामासाठी होत नाही. पुणे शहर महत्वाचे ठिकाण पुणे शहरात हवाई दलाचे विनानतळ, एनडीए, दक्षिण कमांडचे मुख्यालय, खडकी दारूगोळा कारखाना, पुणे, खडकी व देहू रोड अशी तीन कॅन्टोन्मेंट आहेत. त्यामुळे पुणे शहर देशाच्या संरक्षणदृष्ट्या अतिशय महत्वाचे ठिकाण आहे. त्यामुळे एनओडीची परवानगी लागत असल्याचे माहिती अधिकार कार्यकर्ते रामभाऊ फुगे यांनी सांगितले.



एक ते दीड गुंठ्यावर बांधकाम करणाऱ्यांना का?

एमओडीचा ना हरकत परवाना शहरात एक ते दीड गुंठ्यावर बैठे घर किंवा दुमजली घर बांधणाऱ्यांना का एमओडीचा परवाना असा प्रश्न पुणेकरांनी विचारला आहे. आधीच महागाईमुळे घर बांधणे खर्चीक झाले आहे. त्यात यासाठी वीस हजार रूपये शुल्क भरणे अवघड असल्याची प्रतिक्रिया संचल बेंगळे यांनी दिली आहे.

"पुणे शहरात हवाईदल व विमानतळ असल्यामुळे घराचे बांधकाम करताना मिनिस्ट्री ऑफ डिफेन्स (एमओड) ची परवानगी घ्यावीच लागते. अन्यथा महापालिका बांधकाम विभाग परवानगी देत नाही. मोनार्क या संस्थेला भारत सरकारने परवानगी दिली आहे.

उप अभियंता, बांधकाम विभाग , पुणे महापालिका.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने थोर क्रांतिकारक उमाजी नाईक यांना अभिवादन...

पुणे । प्रतिनिधी

थोर क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने अभिवादन करण्यात आले.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीत महापालिकेचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांच्या हस्ते थोर क्रांतिकारक उमाजी नाईक यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते सुभाष जाधव,शेखर गोरगले,प्रशांत माकर,केतन चव्हाण,अजय तटले,आशा तटले,कल्पना माकर,अनिता शितकले,शाहूराज चव्हाण,प्रतिक माकर यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांतील कर्मचारी उपस्थित होते. 'राजे उमाजी नाईक हे इंग्रजांविरुद्ध सशस्त्र लढा उभारणारे थोर क्रांतिकारक मानले जातात. त्यांच्या शौर्य, त्याग आणि देशभक्तीमुळे लोकांमध्ये स्वातंत्र्याची ज्योत अधिकच प्रज्वलीत झाली .राजे उमाजी नाईक यांच्या प्रखर देशभक्तीची प्रेरणा घेऊन अनेकांनी पुढे स्वतः स्वातंत्र्यलढ्यात सक्रीय सहभाग घेतला असे अण्णा बोदडे म्हणाले.

रामोशी, बेडर समाजाच्या सक्षमीकरणासाठी शासन प्रयत्नशील : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दोन लाख रुपयांचे बिगर तारण कर्ज, व्यवसायासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय

पुणे । प्रतिनिधी

रामोशी-बेडर समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून दोन लाख रुपयांपर्यंतचे बिगर तारण कर्ज, तसेच समाजात उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. रामोशी समाजाच्या विकासासाठी यापुढेही सहकार्य करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक यांच्या २३४ व्या जयंतीनिमित्त पुरंदर तालुक्यातील भिवडी येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम

अकुश जाधव, मोहन मदने आदी उपस्थित होते.

इंग्रजांविरुद्ध पहिली ठिणगी पेटवणारे आद्यक्रांतिवीर राजे उमाजी नाईक हे खऱ्या अर्थाने क्रांतिकारक होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या मावळ्यांप्रमाणेच त्यांनी गनिमी काव्याच्या सहाय्याने ब्रिटिशांना धडा शिकवला. समाजाच्या शौर्याची परंपरा आजही जिवंत

पान ३ वर...

समाजाला दोन लाख रुपयांपर्यंतचे बिनतारण कर्ज, तर उद्योजक व व्यावसायिक घडावेत यासाठी १५ लाख रुपयांचे कर्ज देण्यास मंत्रीमंडळाने मंजुरी दिली आहे. पोलिस भरतीसाठी विशेष योजना, तसेच शिक्षण व प्रशिक्षणाकरिता महाज्योती आणि सारथीमार्फत योजना करून विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिष्यवृत्ती, ४२ वसतीगृह व विविध प्रशिक्षण योजना सुरू केल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी १८ पगड जातींना एकत्र करून स्वराज्य उभारले, त्यांचे शिवकार्य पूर्णत्वास नेण्यासाठी सर्व जातींना मुख्य प्रवाहात आणणे हेच शासनाचे ध्येय असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पुण्यातून सेरिसिन चाफर बीटल, नियोसेरिका आकुर्डी कलावटे, २०२५ ची नवीन प्रजाती

पुणे । प्रतिनिधी

भारतीय प्राणी सर्वेक्षण, पश्चिम प्रादेशिक केंद्र, पुणे यांनी नियोसेरिका वंशातील एका नव्या भुंग्याच्या प्रजातीचा शोध लावला आहे. या प्रजातीला नियोसेरिका आकुर्डी कलावटे, २०२५ असे नाव देण्यात आले आहे. ही प्रजाती पुणे जिल्ह्यातील आकुर्डी येथील भारतीय प्राणी सर्वेक्षणाच्या परिसरातून आढळली आहे. या संशोधन पथकात डॉ. अपर्णा कलावटे, पूजा कुमार मिसाल आणि नॅन्सी सुप्रिया यांचा समावेश आहे. हा संशोधन लेख रेकॉर्ड्स ऑफ़ द झूलॉजिकल सर्वे ऑफ़ इंडिया या शास्त्रीय नियतकालिकात प्रकाशित झाला आहे.

स्काराबेइडे कुलातील भुंगे पर्यावरणीय दृष्टीने अत्यंत विविध आहेतकाही गोबरावर उपजीविका करणारे, काही वनस्पतीभक्षक, काही मृतजीवांवर तर काही कुजणाऱ्या सेंद्रिय पदार्थांवर उपजीविका करणारेमेलोलोन्थिनी या उपकुलातील बहुतांश भुंगे वनस्पतीभक्षक असून अनेकदा शेती व बागायती पिकांवर कीड म्हणून हानिकारक ठरतात. नवी प्रजाती देखील याच गटात मोडते आणि पिकांवर संभाव्य कीड म्हणून परिणाम करू शकते.

सेरिसिन चाफर भुंगे उपकुल मेलोलोन्थिनी व जमात सेरिसिनीमध्ये मोडतात। जगभरात याच्या ४,६०० हून अधिक प्रजाती ज्ञात असून, त्यापैकी सुमारे ७०० भारतात आढळतात.नियोसेरिका वंशातील सुमारे २०० प्रजाती ज्ञात असून त्याचे वर्गीकरण गुंतागुंतीचे मानले जाते. हे भुंगे आकाराने लहान व रंगाने साधारणपणे तपकिरी ते काळे असतात. फक्त बाह्य संरचना पाहून प्रजाती ओळखणे कठीण असल्याने नर जननेंद्रियांचा अभ्यास करणे अत्यावश्यक असते. नियोसेरिका आकुर्डी ही नवी प्रजाती आकुर्डी परिसरातून संकलित केलेल्या व पुणे केंद्रातील संग्रहात उपलब्ध नमुन्यांच्या सखोल अभ्यासावरून निश्चित करण्यात आली आहे. ही आकुर्डी परिसरातून डॉ. अपर्णा कलावटे यांनी शोधलेली दुसरी नवी प्रजाती आहे। यापूर्वी येथेच एक टायगर पतंग ओलेपा झेडेसाय कलावटे, २०२० याची नवी प्रजातीआढळली होती.

शोधाचे महत्त्व

भारताच्या अनेक भागांत हे वनस्पतीभक्षक भुंगे अद्याप अल्प-अभ्यासित आहेत किंवा फक्त जुन्या नोंदींमध्येच ज्ञात आहेत। त्यांच्या अळ्या पिकांच्या मुळांवर उपजीविका करून उत्पादन घटवतात, तर प्रौढ भुंगे पाने व फुले खातात त्यामुळे या गटातील प्रजातींचे दस्तावेजीकरण आणि अचूक ओळख करणे हे पीक संरक्षण, कीड व्यवस्थापन आणि जैवविविधता संवर्धनासाठी अत्यंत आवश्यक आहे. हा शोध भारतातील स्कॅराब भुंग्यांच्या समृद्ध पण कमी अभ्यासलेल्या विविधतेवर प्रकाश टाकतो व वर्गीकरणशास्त्रीय संशोधनाचे महत्त्व अधोरेखित करतो.

राज्यभरातील वृत्तपत्रात संपूर्ण पान जाहिरातीचे गूढ

काळ्या पैशाचा वापर असल्याची खासदार राऊत यांची टीका

पुणे । प्रतिनिधी

दोन दिवसापूर्वी राज्यातील आघाडीच्या सर्व वृत्तपत्रांमध्ये देवा भाऊ ची अर्थात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्प अर्पण करतानाचे छायाचित्र आहे. एक नव्हे तर दोन संपूर्ण पानांची जाहिरात प्रसिद्ध झाली. ही जाहिरात कोणी प्रसिद्ध केली, कोणत्या संस्थेने केली या अथवा व्यक्तीने केली याची माहिती नाही. असे आमदार रोहित पवार यांनी तर यामध्ये काळा पैशाचा वापर झाला असल्याची टीका खासदार संजय राऊत यांनी केली आहे.

जाहिरातीचा अर्थ जरी सर्व जनतेला कळले असले तरी ही जाहिरात कोणी दिली याची माहिती वृत्तपत्रांनी जाहिरात देणाऱ्या प्रायोजित कंपनी

अथवा व्यक्ती याचा उल्लेख नाही. त्यामुळे जाहिरातीमध्ये कोणाचाच नामोल्लेख दिसत नाही. याचा अर्थ या जाहिरातीमध्ये कोट्यावधी रुपये खर्च झाले असणार स्वभाविकच आहे . हा पैसा काळा पैसा नव्हे का असा संशय येतो असे राऊत यांनी सांगितले.

एकंदरच या जाहिरातीमध्ये नाव टाकण्याची धाडस प्रायोजकाने का घेतली नाही. सर्वच वृत्तपत्रांनी संबंधित व्यक्तीचे अथवा संस्थेचे एका

पान ३ वर...